नवप्रभा

## निवडक

# लक्ष्मीबाई महाविद्यालयात विद्यार्थी स्नेहमेळावा उत्साहात

दोडामार्ग (न. प्र.)

लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात तृतीय वर्ष वाणिज्य वर्गाचा शिक्षक-पालक विद्यार्थी स्नेहमेळावा नुकताच संपन्न झाला. शिक्षक, पालक व विद्यार्थी यांच्यात सुसंवाद निर्माण व्हावा व त्यातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीस हातभार लागावा या उद्देशाने सदर स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रा. डॉ. व्ही. ए. पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांचा शिक्षणाबरोबरच सर्वांगीण विकास व्हावा यासाठी अनेक उपक्रम राबविले जातात. यात पालक म्हणून आपली जबाबदारी काय आहे हे जाणून घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे आपला विद्यार्थी योग्य मार्गक्रमण करतो की नाही; याकडे लक्ष ठेवावे. आपला पाल्य फक्त परीक्षार्थी न बनता सर्वगुण संपन्न बनविणे आवश्यक असून त्यासाठी महाविद्यालयाप्रमाणेच कुटुंबातही शैक्षणिक वातावरण निर्माण करावे, असे आवाहन त्यांनी पालकांना उद्देशून केले.

यावेळी व्यासपीठावर डॉ. एम्. टी. बेग, प्रा. एस. एन. खडपकर, डॉ. आर.एस. इंगळे, पालक प्रमुख म्हणून लाडोबा देसाई उपस्थित होते.